महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक निअंक-१०८६/१७७१/सेवा-४.

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० मे १९८८

शासन निर्णय

सध्याच्या निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरण नियमानुसार, निवृत्तिवेतनधारकाने आपल्या निवृत्तिवेतनाच्या एक-तृतीयांश यापेक्षा अधिक होणार नाही एवढा भाग कायमचा सोडून दिल्यास त्या भागाऐवजी एकरकमी ठोक रक्कम घेण्याचा त्यास हक्क असतो. अशा प्रकारचे अंशराशीकरण निवृत्तिवेतनधारकाच्या इच्छेनुसार सेवानिवृत्तीनंतर लागलीच किंवा त्यानंतर केव्हाही करता येते. राज्य शासकीय निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत भाग पुन:स्थापित करण्याबाबतचा प्रश्न काही कालावधीपासून शासनाच्या विचाराधीन होता. त्याबाबत शासन आता खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे :—

(अ) ज्या राज्य शासकीय निवृत्तिवेतनधारकांनी आपल्या निवृत्तिवेतनाचा भाग अंशराशीकृत केलेला आहे आणि ज्यांनी दिनांक १ एप्रिल १९८५ रोजी किंवा त्यानंतर आपल्या सेवानिवृत्तीचा दिनांकापासून १५ वर्षे पूर्ण केली आहेत/किंवा करतील अशा निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत केलेला भाग पुन:स्थापित करण्यात यावा.

(ब) ज्या प्रकरणी सेवानिवृत्तीनंतरचा १५ वर्षांचा कालावधी दिनांक १ एप्रिल १९८५ पूर्वीच पूर्ण झालेला आहे, त्या प्रकरणी निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत भाग दिनांक १ एप्रिल १९८५ पासून पुन:स्थापित करण्यात यावा.

२. ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी राज्य सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये/स्वायत्त संस्थांमध्ये/स्थानिक सस्था इत्यादीमध्ये स्वत:ला सामावून घेतले असेल आणि निवृत्तिवेतनाच्या १/३ भागाचे अंशराशीकृत मूल्य, तसेच निवृत्तिवेतनाच्या १/३ भागाचे अंशराशीकरण केल्यानंतर उरलेल्या निवृत्तिवेतनाच्या रकमेच्या अंशराशीकृत मूल्याइतके अंतिम लाभ स्वीकारले असतील/स्वीकारण्याचा विकल्प दिलेला असेल ते कर्मचारी राज्य शासनाचे निवृत्तिवेतनधारक राहत नसल्या-मुळे त्यांना या आदेशाखालील कोणताही लाभ मिळण्याचा हक्क असणार नाही.

३. वरील परिच्छेद १ च्या तरतुदीनुसार निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत केलेला भाग पुन:स्थापित करण्यास पात्र असणाऱ्या प्रत्येक निवृत्तिवेतनधारकाने सोबत जोडलेला (जोडपत्र एक) विहित नमुन्यातील अर्ज, यथोचितरीत्या पूर्ण करून निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकाऱ्याकडे दाखल करणे आवश्यक आहे. निवृत्तिवेतन प्रदान आदेशांमध्ये जर अंशराशीकृत केलेली रक्कम नमूद करण्यात आली असेल तर निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत केलेला भाग पुन:-स्थापित करून, असल्यास, थकबाकीच्या रकमेचेही प्रदान करील.

४. १ एप्रिल १९८५ रोजी किंवा त्यानंतर निवृत्तीच्या तारखेपासून १५ वर्षे पूर्ण झालेल्या व हयात असलेल्या पण त्यानंतर मृत्यू पावलेल्या निवृत्तिवेतनधारकाच्या बाबतीत त्याच्या/तिच्या कायदेशीर वारसाला/वारसांना देखील, १ एप्रिल १९८५ पासून (किंवा निवृत्तीच्या तारखेपासून १५ वर्षे ज्या तारखेला पूर्ण झाली असतील यापैकी जी नंतरची तारीख असेल त्या तारखेपासून) निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्यूच्या तारखेपर्यंतची हयातकालीन थकबाकी मिळण्याचा हक्क असेल. यासाठी कायदेशीर वारस हा/हे निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकाऱ्याकडे अर्ज करू शकेल/शकतील.

५. ज्या प्रकरणी अंशराशीकृत केलेल्या भागाची माहिती निवृत्तिवेतन प्रदान आदेशांत नोंदलेली नसेल अशा प्रकरणी निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी ती माहिती ज्या लेखा अधिकाऱ्याने निवृत्तिवेतन प्रदान आदेश काढलेले आहेत त्यांचेकडून प्राप्त करून घेईल.

६. निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी पुन:स्थापित केलेल्या रकमेची पडताळणी करण्याच्या दृष्टीने प्रत्येक निवृत्ति-वेतनाच्या प्रकरणाचा संपूर्ण तपशील ज्या लेखा अधिकाऱ्याने निवृत्तिवेतन प्रदान आदेश काढलेले आहेत, त्यांच्याकडे सोबत जोडलेल्या जोडपत्र दोनमधील नमुन्यात पाठवील.

(शा.म.मु.) एच ४१२ (११,०९०—६—८८)

७. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ किंवा ते नियम लागू करण्यापूर्वी अस्तित्वात असलेले निवृत्तिवेतन नियम यानुसार, निवृत्तिवेतन घेणाऱ्या निवृत्तिवेतनधारकांना हे आदेश लागू होतील. ज्या शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवानिवृत्तीच्या वेळी भूतपूर्व मुंबई, हैद्रावाद व मध्यप्रदेश या राज्यांचे जे निवृत्तिवेतन नियम लागू होते त्या नियमांन्वये निवृत्तिवेतन घेणाऱ्या निवृत्तिवेतनधारकांना देखील हे आदेश लागू होतील.

८. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम ५) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करून, शासन आणखी असाही निर्णय घेत आहे की, हे आदेश जिल्हा परिषद निवृत्तिवेतनधारकांना लागू होतील.

९. या शासन निर्णयाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नरेंद्र कर्णिक,
शासनाचे उप सचिव.

प्रति--

भारत सरकारचे सचिव, वित्त मंत्रालय, नवी दिल्ली
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई (१२५ प्रती)
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती)
महालेखापाल-१ (लेखापरीक्षा) महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती)
महालेखापाल-२ (लेखापरीक्षा) महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती)
मुख्य लेखा अधिकारी, बी ब्लॉक, दिल्ली प्रशासन, विकास भवन, नवी दिल्ली (५ प्रती)
नियंत्रक, लेखा, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली (१० प्रती)
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (१५ प्रती)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती)
उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १० प्रती)
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती)
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती)
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती)
राज्यपालांचे सचिव
मुख्य मंत्र्यांचे सचिव
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
*प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
मंत्रालयातील सर्व विभाग
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती)
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती)

सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष (प्रत्येकी ५ प्रती)
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी १० प्रती)
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती)
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती)
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती)
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती)
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती)
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई दक्षिण/उत्तर/पश्चिम
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती)
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती)
सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती)
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती)
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (१० प्रती)
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती)
कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती)
ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती)
शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती)
कृषि व सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती)
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, कार्यासन सेवा-४

---

*पत्राद्वारे

१९८८ चा क्रमांक

(शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. निअंक-१०८६/१७७१/सेवा-४, दिनांक ३० मे १९८८ चे जोडपत्र)

जोडपत्र एक

ANNEXURE I

FORM OF APPLICATION

To

The Pay and Accounts Officer, Bombay.
The District Treasury Officer..........

Subject.—Restoration of Commuted Portion of Pension after 15 years.

Sir,

Kindly restore my Commuted Portion of Pension in terms of Government Resolution, Finance Department, No. COP-1086/1771/SER-4, dated 30th May 1988. Requisite particulars are given below:—

1. Full Name in Block letters .. ..
2. Date of Retirement .. ..
3. Name of Department/Office from which retired. ....
....
4. Pension Payment Order No. .. ..
5. Amount of Original Pension .. ..
6. Amount of Pension commuted .. ..
7. Amount of net Pension i.e. after commutation of Pension. ....
8. Name of the Accounts Officer, viz. the Authority who issued the Pension Payment Order. ....
9. Name of the Treasury .. ..
10. Name of the Bank and branch from which receiving Pension and Account No. ....

Date : Signature of Pensioner

Postal Address :

(शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक निअंक-१०८६/१७७१/सेवा-४, दिनांक ३० मे १९८८ चे जोडपत्र)

जोडपत्र दोन

ANNEXURE II

Form of Intimation by the Pension Disbursing Authority to the Pension Payment Order Issuing Authority regarding restoration of Commuted Portion of Pension in terms of Government Resolution, Finance Department, No. COP-1086/1771/SER-4, dated 30th May 1988

(Particulars of Pension Disbursing Authority)

1. Name of Pensioner .. ..
2. Date of Retirement .. ..
3. Pension Payment Order No. .. ..
4. Amount of Original Pension .. ..
5. Amount of Pension commuted .. ..
6. Amount of Pension restored .. ..
7. Effective Date of restoration .. ..
8. Amount of Pension after restoration .. ..
9. Additional remarks, if any .. ..

(Signature of Officer-in-charge)

Pay and Accounts Officer, Bombay/
Treasury Officer..........

To

The Accountant General (A & E)-I, Maharashtra, Bombay.
The Accountant General (A & E)-II, Maharashtra, Nagpur.

Restoration of Commuted Portion of Pension.

GOVERNMENT OF MAHARASHTRA

FINANCE DEPARTMENT

Government Resolution No. COP-1086/1771/SER-4
Mantralaya, Bombay 400 032, dated 30th May 1988

RESOLUTION

Under the existing rules for Commutation of Pension a pensioner is entitled to a lumpsum payment if he surrenders permanently a portion of his pension not exceeding one-third thereof. This commutation is permissible immediately after retirement or at any time thereafter at the option of retiree. The question of restoring the commuted portion of pension of State Government Pensioners was under consideration of Government for some time past. Government is now pleased to decide as follows :—

(*a*) The State Government Pensioners who have commuted a portion of their pension and on 1st April 1985 or thereafter have completed/or will complete 15 years from their respective dates of retirement will have their commuted portion of pension restored.

(*b*) In cases, where period of 15 years of retirement is already over before 1st April 1985, commuted portion of pension is to be restored with effect from 1st April 1985.

2. The State Government employees who got themselves absorbed under Public Sector Undertakings/Autonomous bodies/Local Bodies etc. and have received/or opted to receive commuted value for one-third of pension as well as terminal benefits equal to the commuted value of the balance amount of pension left after commuting one-third of pension are not entitled to any benfit under these orders as they have ceased to be State Government Pensioners.

3. Each Pensioner, who is eligible to get the commuted portion of his pension restored in terms of Paragraph 1 above is required to apply in the enclosed prescribed *proforma* (Annexure-I) duly completed, to the Pension Disbursing Authority who will restore the Commuted portion of pension, if the commuted amount has been mentioned in the Pension Payment Order and will also pay the arrears, if any.

4. In cases where the pensioner has completed 15 years from the date of retirement on 1st April 1985 or thereafter and had died subsequently, his/her legal heir(s) is/are also entlited to receive arrears with effect from 1st April 1985 (or from the date of completion of 15 years from the date of retirement whichever is later), till the date of the pensioner's death. For this purpose, legal heir(s) may also apply to the Pension Disbursing Authority.

5. In the cases where the Pension Payment Order does not contain information regarding commuted portion, Pension Disbursing Authority will obtain the information from the Accounts Officer which issued the Pension Payment Order.

6. The Pension Disbursing Authority will intimate to the Accounts Officer, who had issued the Pension Payment Order, the full particulars of each pension case along with the amount of pension restored for verifying its correctness, in the Form given at Annexure II attached to the Marathi version of this Resolution.

7. These orders also apply to pensioners who are drawing pension under the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 or the pension rules which were in existence prior to the introduction of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982. They shall also apply to pensioners who are drawing Pension under the Pension Rules of the former States of Old Bombay, Hyderabad and Madhya Pradesh applicable to them at the time of their retirement.

8. In exercise of the powers conferred by the proviso to section 248 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Maharashtra V of 1962) and of all other powers enabling it in that behalf, Government is further pleased to decide that these orders also apply to Zilla Parishad pensioners.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

N. W. KARNIK,
Deputy Secretary to Government.